**पाहिजेत**
दैनिक अट्टल संकेतसाठी संपूर्ण महाराष्ट्रात वार्ताहर, प्रतिनिधी नेमणे आहेत.
संपर्क - ९६२३४८४४८४

दैनिक
# अट्टल संकेत
ATTAL SANKET

Email : attalsanket2023@gmail.com
RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-२८५ ■ मंगळवार, दि. ४ फेब्रुवारी २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये

■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -285 ■ Tuesday, 4 Feb 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-

## शिर्डीत साई संस्थानच्या दोन कर्मचाऱ्यांची हत्या; एक जखमी ; लुटमारीचा संशय, संशयीत ताब्यात

**राहाता :** शिर्डी येथील साईबाबा संस्थानच्या दोन कर्मचाऱ्यांवर लुटीच्या उद्देशाने मोटारसायकलवरून आलेल्या अनोळखी तरुणांनी धारदार शस्त्राने हल्ला करीत त्यांची निर्घृण हत्या केली. तर आणखी एका वयोवृद्धावर असाच हल्ला झाल्याने ते गंभीर जखमी झाले आहेत. सोमवारी पहाटेच्या सुमारास या दोन्ही घटना घडल्या. याप्रकरणी शिर्डी व राहाता पोलिसांनी दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करत एका संशयिताला ताब्यात घेतले आहे.

सुभाष घोडे व नितीन शेजूळ (दोघेही रा. शिर्डी) अशी मृत तरुणांची नावे आहेत. कृष्णा देहरकर असे गंभीर जखमी वृद्धाचे नाव आहे. सुभाष व नितीन पहाटे साई संस्थानमध्ये कामावर जात असताना त्यांची दुचाकी अनोळखी तरुणांनी अडवून त्यांच्यावर धारदार शस्त्राने हल्ला केला. या हल्ल्यात दोघे गंभीर जखमी झाले. वेळेवर मदत न मिळाल्याने त्यांचा जागेवरच मृत्यू झाल्याचे समजते. तर कृष्णा देहरकर हे वयोवृद्ध आपल्या मुलाला शिर्डीतील बस स्थानकावर पोहचवून परतताना शिर्डी-साकुरी शिवारात त्याच अनोळखींनी धारदार शस्त्राने हल्ला करून गंभीर जखमी केले. त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने लोणी येथील प्रवरा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मोटारसायकलवरील तरुणांनी चोरीच्या उद्देशाने या तिघांना वेगवेगळ्या वेळेत अडवून त्यांच्याकडील रक्कम हिसकावून घेतली. हल्ल्याची घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली आहे. पोलिसांनी किरण सदाफुले याला संशयावरून ताब्यात घेतले आहे तर राजू माळी हा दुसरा संशयित तरुण आहे. पोलिसांनी विविध पथक तैनात करून त्याचा शोध सुरू केला आहे.

शिर्डीमधील या घटना अत्यंत दुर्दैवी आहेत. येथे बाहेरचे गुन्हेगार येऊन अशा घटना करतात. शिर्डीची गुन्हेगारी मोडून काढण्यासाठी कठोर पावले उचलण्यात येतील.

– **डॉ. सुजय विखे**, माजी खासदार

साकुरी-राहाता रस्त्यावर अनोळखी व्यक्तींनी लुटमार करण्याच्या उद्देशाने धारदार हत्याराने दोघांची हत्या केली. याबाबत गुन्हा दाखल केला असून, तपास सुरू आहे.

– **प्रदीप देशमुख**, प्रभारी पोलीस निरीक्षक, राहाता

## मंत्रालय प्रवेशाचा बट्ट्याबोळ; ‘चेहरा पडताळणी’साठी करण्यात आलेल्या अट्टहासाने कर्मचारी हैराण

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

चेहरा पडताळणी झाल्याशिवाय मंत्रालयात प्रवेश देण्याच्या निर्णयाची सक्तीच्या पहिल्याच दिवशी या योजनेचा पार बट्ट्याबोळ झाला. अनेक सहसचिवांपासून कर्मचाऱ्यांच्या चेहऱ्यांची पडताळणी होऊ न शकल्याने त्यांना प्रवेश नाकारण्यात आला. परिणामी मंत्रालयाच्या बाहेर सकाळी प्रचंड गोंधळ झाला. मुख्यमंत्री व मुख्य सचिवांच्या अट्टहासामुळे कर्मचारी पार हैराण झाले होते. सर्व प्रक्रिया पूर्ण करूनही चेहऱ्यांची पडताळणी होत नसल्याबद्दल कर्मचाऱ्यांनी संतप्त भावना व्यक्त केली.

मंत्रालयाच्या सुरक्षिततेमध्ये वाढ करतानाच अनधिकृत प्रवृत्तींनाही चाप लावण्याचा दावा करीत राज्य सरकारने मंत्रालय प्रवेशासाठी लागू केलेल्या चेहरा पडताळणी (फेस डिटेक्शन) आधारित एफआरएस तंत्रज्ञान प्रणाली मंत्रालयात येणाऱ्या सामान्य नागरिकांसोबतच प्रशासन आणि पोलिसांसाठी डोकेदुखी ठरू लागली आहे.



सोमवारी अचानकपणे या योजनेची काटेकोरपणे अंमलबजावणी सुरू करण्यात आल्याचा सर्वाधिक फटका मंत्रालयातील अधिकारी-कर्मचारी आणि मंत्री कार्यालयांना बसला.

**कोटी थकीत; वसुलीसाठी महारेराकडून उपनगर जिल्हाधिकाऱ्यांना पत्र**

या नव्या प्रणालीच्या अंमलबजावणीबाबत नागरिकांना तसेच मंत्रालयातील कर्मचाऱ्यांना पुरेशी कल्पना न देण्यात आल्याने प्रवेशद्वारावरील पोलीस आणि कर्मचाऱ्यांमध्ये दररोज वाद होऊ लागले आहेत. सोमवारी अचानकपणे या योजनेची अंमलबजावणी करताना कोणत्याही अधिकारी-कर्मचाऱ्यांना प्रवेश न देण्याची भूमिका घेतल्यामुळे शेकडो कर्मचाऱ्यांना तासभरापेक्षा अधिक काळ मुख्य प्रवेशद्वारासमोर ताटकळत थांबावे लागले. आतापर्यंत १० ते ११ हजार कर्मचाऱ्यांची चेहऱ्यांची पडताळणी झाली असून, अजूनही अधिकारी कर्मचारी शिल्लक आहेत.

**माहिती तंत्रज्ञान विभागात पुरेसे कर्मचारीच नाहीत**

या योजनेची अंमलबजावणी माहिती आणि तंत्रज्ञान विभागाच्या माध्यमातून केली जात असून त्यांच्याकडे कर्मचाऱ्यांची माहिती अपलोड करण्यासाठी मनुष्यबळाची टंचाई आहे. त्यामुळे या प्रक्रियेला विलंब होत

असल्याची माहिती गृहविभागातील सूत्रांनी दिली. वास्तविक ही प्रणाली लागू करण्यापूर्वी मुख्य सचिव सुजाता सौनिक किंवा सामान्य प्रशासन विभागाच्या सचिवांनी सर्व कर्मचाऱ्यांची माहिती जमा झाली का तसेच या योजनेची अंमलबजावणी करणे शक्य आहे का, याची माहिती घेणे आवश्यक होते.
पण कोणतीही खातरजमा न करता मुख्य सचिवांच्या कार्यालयाकडून योजनेच्या सक्तीचे आदेश निघाल्याने सारा गोंधळ झाला.

मंत्री, आमदारांना वेगळा न्याय एकीकडे नागरिक आणि मंत्रालय कर्मचाऱ्यांसाठी चेहऱ्याची पडताळणी बंधनकारक करण्यात आली असली, तरी लोकप्रतिनिधींना मात्र कसलेही बंधन नाही. मंत्री, आमदारांसोबत येणाऱ्या कार्यकर्त्यांना थेट प्रवेश दिला जात असून काही वेळा मंत्री, सचिवांच्या गाडीतून मर्जीतील लोकांना आत आणले जात असल्याची माहितीही सूत्रांनी दिली.

## महाराष्ट्र केसरीच्या पंचांना जन्मठेप देणार का? शिवराज राक्षेच्या निलंबनानंतर कुस्ती प्रशिक्षकांचा संतप्त सवाल

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महाराष्ट्र केसरी २०२५ च्या उपांत्य फेरीच्या सामन्यात पृथ्वीराज मोहोळ आणि शिवराज राक्षे एकमेकांविरूद्ध भिडले. महाराष्ट्र केसरीच्या पंचांनी अवघ्या ४० सेकंदात पृथ्वीराज मोहोळ विजयी झाल्याचं घोषित केलं आणि यानंतर कुस्तीच्या मॅटवर मोठा वादंग पाहायला मिळाला. शिवराज राक्षेने पंचांशी हुज्जत घातली. शिवराजने रिव्ह्यू पाहून निर्णय देण्याची मागणी केली पण पंचांनी त्याकडे दुर्लक्ष केले. मग त्याने पंचांशी बोलताना त्यांची कॉलर धरली आणि लाथदेखील मारली. यानंतर शिवराज राक्षेवर कुस्तीगीर परिषदेने ३ वर्षांच्या निलंबनाची कारवाई केली आहे.

शिवराज राक्षेच्या या वादावर अर्जुन पुरस्कारप्राप्त कुस्तीपटू आणि प्रशिक्षक काका पवार यांनी मोठं वक्तव्य केलं आहे आणि अनेक सवाल विचारले आहेत. महाराष्ट्र केसरी कोण होणार हे स्पर्धेच्या आधीच ठरलं जातं असा गंभीर आरोप काका पवारांनी केला आहे. शिवराज आणि महेंद्र गायकवाड ३ वर्षांची बंदी घातल्यानंतर पंचांना जन्मठेप द्या अशी मागणीदेखील काका पवारांनी केली आहे. पण शिवराजच्या चुकीचं समर्थन करणार नसल्याचंही त्यांनी सांगितलं.

**डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटलांचा शिवराज राक्षेला पाठिंबा**

कुस्ती प्रशिक्षक काका पवार काय म्हणाले, मी दोघांचही (पंच आणि शिवराज राक्षे) समर्थन करत नाही. काय झालं हे मला माहितही नाही. पण तुम्ही जर एखाद्यावर अन्याय करण्याचा प्रयत्न करत असाल तर माणसाच तोल सुटतोच, कोणाचाही सुटतो. राजकारण्यांचा तोलही जातो आणि मग यांचाही जातोच. हे तर पैलवान आहेत, रोज तुपातलं खाणारे आहेत. ह्यांचा संयम तुटला असेल पण तुम्ही एवढी मोठी शिक्षा (३ वर्ष निलंबन) देणार? मग पंचांना काय करणार जन्मठेप देणार त्यांना तुम्ही?

रिप्लेमध्ये दिसतंय पंचांचा निर्णय चुकलाय पणः, महाराष्ट्र केसरीमधील वादानंतर परिषदेच्या पदाधिकाऱ्यांचं मोठं वक्तव्य

दोन्ही संघटनांवर राजकीय प्रभाव आहे त्याबाबत बोलताना म्हणाले, आजवर कोणी केलेला नाही. ते फक्त पाहायला होते सगळेजण, उगीच कशाला आळ घ्या. अनेकजण होते तिथे तेव्हा शिवराज मुरली अण्णा, अजित दादा यांच्याकडे न्याय मागायला जात होता, पण त्याला जाऊ दिलं नाही.

तो रिव्ह्यू बघायला जात होता ते पाहू दिलं नाही, अरे का काही इंटरनॅशनल आहे काय ते? पण उपस्थित राजकारण्यांनी तिथे प्रश्न विचारायला हवे होते की काय झालं रिव्ह्यू बघा का नकार देताय असंः कोणत्या पैलवानाला यावेळेस महाराष्ट्र केसरी करायचं हे ठरतं का आधी? यावर काका पवार म्हणाले, हो ठरतं ना त्यांच्यात, ठरलं म्हणून तर झालं हेः पैलवान मॅचफिक्सिंग नाही करत पण संघटनेचं असतं ना पंचावर दबाव टाकणे, पुढचं नीट करणे, तू हे नीट कर आम्ही आहोत तुझ्या पाठीशी. असं करून चालेल का?
मग तुमचे पैलवान ऑलिम्पिकला जातील का? तुम्ही इथेच पैलवानकी संपवत राहिलात तर पुढे कसे जाणार?

## सरकारी कार्यालयात ‘मराठीतच बोला!’ कर्मचारी मराठीत न बोलल्यास शिस्तभंगाची कारवाई

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

राज्यात मराठी भाषा धोरण लागू झाल्यानंतर आता सरकारी कार्यालयांत मराठी अनिवार्य करण्यात आले आहे. यानुसार आता सरकारी, निमसरकारी, स्थानिक स्वराज्य संस्था, महामंडळे तसेच सरकारचे अनुदान घेणाऱ्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांना व तिथे येणाऱ्यांना मराठीतच बोलावे लागणार आहे. ‘मराठीत बोला’ अशा आशयाचे फलक या कार्यालयांत अनिवार्य करण्यात आले असून याची अंमलबजावणी न झाल्यास संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येणार आहे.

मराठीच्या अनिवार्यतेबाबतचा शासन निर्णय नियोजन विभागाकडून सोमवारी जारी करण्यात आला. मराठीतून न बोलणाऱ्ये अधिकारी, कर्मचाऱ्यांची तक्रार थेट संबंधित विभागप्रमुख, कार्यालयप्रमुखाकडे करता येणार आहे. त्याची पडताळणी करून संबंधित सरकारी अधिकारी, कर्मचारी दोषी आढळल्यास त्याच्याविरोधात शिस्तभंगाची कारवाई करण्यात येणार आहे. ही कारवाईही तक्रारदाराला समाधानकारक न वाटल्यास मराठी भाषा समितीकडे याविरोधात अपील करता येणार आहे.

प्रस्ताव, पत्रव्यवहार मराठीतच

सर्व शासकीय कार्यालयांतील मूळ प्रस्ताव, सर्व पत्रव्यवहार, टिप्पण्या, आदेश, संदेशवहन मराठीतच असतील व कार्यालयीन स्तरावरील सर्व प्रकारची सादरीकरणे व संकेतस्थळे मराठीत असतील. त्याचप्रमाणे केंद्र सरकारच्या त्रिभाषा सूत्रानुसार राज्यातील केंद्र सरकारची सर्व कार्यालये तसेच सर्व बँका इत्यादींमध्ये दर्शनी भागात लावण्यात येणारे सूचनाफलक, अधिकाऱ्यांचे नामफलक, अर्ज नमुने मराठीतून असणे अनिवार्य करण्याचे आदेश या निर्णयाद्वारे देण्यात आले आहेत. महामंडळे, मंडळे, शासन अंगीकृत उपक्रम, कंपन्या यांची शासनाने निश्चित केलेली मराठी नावेच आस्थापनांच्या कामकाजात वापरली जातील. त्याचप्रमाणे वृत्तपत्रे तसेच प्रसारमाध्यमांत दिल्या जाणाऱ्या जाहिरातींतही मराठीच अनिवार्य करण्यात आली आहे. सर्व जाहिराती, निविदा, सूचना इत्यादी मराठी भाषेतूनच देण्यात याव्यात, असेही आदेश देण्यात आले आहेत. संगणकावरही मराठीच संगणकावरही मराठीचाच वापर असावा, संगणकाच्या कीबोर्डवरील अक्षरेही मराठीतूनच असावीत, असे या शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

## ‘पुरस्कार परत देणार नाही असं आधीच लिहून घ्या’, संसदीय समितीची शिफारस, निषेध म्हणून पुरस्कार वापसीवर आक्षेप!

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

देशातील एखाद्या राजकीय मुद्द्यावर किंवा एखाद्या धोरणावर आपली नाराजी किंवा निषेध व्यक्त करण्यासाठी अनेक मान्यवर, साहित्यिक, कलाकार किंवा विभिन्न क्षेत्रातील पुरस्कारप्राप्त दिग्गज पुरस्कार परत करण्याची भूमिका घेताना दिसतात. या कृतीतून सरकारच्या एखाद्या भूमिकेचा निषेध करण्याचा मार्ग हे मान्यवर स्वीकारतात. पण अशा कृतीमुळे त्या पुरस्काराचाच मान राखला जात नाही, असं म्हणत मिळालेले पुरस्कार परत करणार नाही, असं आधीच संबंधितांकडून लिहून घ्या, अशी शिफारस संसदीय समितीनं केली आहे. त्यामुळे आता निषेध करण्याचा हा मार्ग मान्यवरांसाठी बंद होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

जदयूचे संजय झा यांच्या अध्यक्षतेखालील वाहतूक, पर्यटन व संस्कृती विषयावरील समितीकडून ही शिफारस करण्यात आली आहे. सदर मान्यवर निषेध म्हणून त्यांचे पुरस्कार परत करतात, पण ज्या अकादमींकडून त्यांना हे पुरस्कार देण्यात आलेले असतात, त्यांच्याशी मात्र संलग्न राहतात किंवा त्या अकादमींसाठी काम करत राहतात, त्यामुळे त्यांच्याकडून पुरस्कार परत देणार नाही, असं आधीच लिहून घ्यावं, अशी शिफारस या समितीनं केल्याचं टाइम्स ऑफ इंडियानं दिलेल्या वृत्तात म्हटलं आहे.

### सोमवारी सादर झाला संसदेत अहवाल

**दरम्यान, या समितीचा अहवाल सोमवारी लोकसभेत सादर झाला. एखाद्या राजकीय मुद्द्याशी असहमती असल्यास त्यावर निषेध म्हणून अशा प्रकारे पुरस्कार परत दिलेल्या मान्यवरांचाही या अहवालात उल्लेख करण्यात आला. मात्र, ज्या मुद्द्यांवर त्यांनी निषेध नोंदवला, ते राजकीय मुद्दे हे संबंधित सांस्कृतिक परीक्षाच्या किंवा अकादमीच्या कार्यक्षेत्राच्या बाहेरचे होते, असंही या अहवालात नमूद करण्यात आलं आहे.**

समिती अध्यक्ष म्हणतातः

दरम्यान, याआधी जेव्हा ही शिफारस मांडण्यात आली होती, तेव्हा केंद्र सरकारनं अशा प्रकारे आधीच त्या व्यक्तीकडून लेखी घेतल्यास संबंधितांची नावं पुरस्कार मिळण्याआधीच उघड होण्याची भीती व्यक्त केली होती. मात्र, त्यावर समिती अध्यक्ष संजय झा यांनी पर्याय सुचवला आहे.

पुरस्कार मिळणाऱ्या व्यक्तींकडून सदर माहिती जाहीर न करण्याच्या प्रतिज्ञापत्रावरही सही घेतल्यास हा मुद्दा निकाली निघेल, असं त्यांनी सुचवलं आहे. मात्र, ही प्रक्रिया कायदेशीररीत्या राबवणं कठीण जाईल, असं सांस्कृतिक मंत्रालयाकडून सांगण्यात आल्याचं सदर वृत्तात नमूद केलं आहे. दरम्यान, सांस्कृतिक मंत्रालयाने भविष्यात अशा प्रकारच्या समस्या उद्भवू नयेत, यासाठी पावलं उचलायला हवीत. त्याशिवाय, जे कलाकार पुरस्कार परत देतात पण संबंधित अकादमीशी संलग्न राहतात, त्यांच्यावर लक्ष ठेवण्याची प्रणालीही प्रस्थापित करावी, असंही समितीनं शिफारशीत नमूद केलं आहे.

राज्याच्या निकालाचे संसदेत पडसाद; निवडणूक आयोगाच्या निष्पक्षतेवर राहुल गांधींकडून शंका

अशा प्रकारे पुरस्कार परत दिल्याने इतर पुरस्कारप्राप्त मान्यवरांच्या कामगिरीचा अवमान होत असून पुरस्काराच्या महत्तेलाही धक्का पोहोचतो. प्रत्येक अकादमीकडून दिला जाणारा पुरस्कार हा सर्वोच्च सन्मान असतो. अशा अकादमी या अराजकीय संघटना असतात, असंही समितीनं आपल्या अहवालात नमूद केलं आहे.

# ‘हिंडेनबर्ग’चा गुंडाळलेला गाशा

हिंडेनबर्ग रिसर्च’चे संस्थापक अँडरसन यांच्याविरुद्ध अमेरिका आणि इतर अनेक देशांच्या न्यायालयात शेकडो खटले प्रलंबित आहेत. हिंडेनबर्ग अहवालात अदानी उद्योगसमूहाच्या सेबीच्या प्रमुख माधवी बूच यांच्याशी व्यावसायिक संबंध असल्याचा आरोप झाला होता. त्यावरून सेबीने हिंडेनबर्गला कारणे दाखवा नोटीस पाठवली होती. त्यावर पाच महिन्यांनंतरही ‘हिंडेनबर्ग’कडून कोणताही प्रतिसाद आला नाही. जगभरातील इतर अनेक नियामकांनीही अँडरसन यांच्याविरुद्ध अब्जावधी रुपयांचे मानहानीचे दावे दाखल केले आहेत. अँडरसन यांनी अनेक अहवाल तयार करुन, त्याचे आर्थिक पडसाद अजमावत अब्जावधी रुपये कमावल्याचाही आरोप आहे. अमेरिकेचे नवनिर्वाचित अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प त्यांच्याविरुद्धच्या तक्रारींच्या ढिगाऱ्याची चौकशी करण्याचे आदेश देऊ शकतात, अशी भीती अँडरसन यांना आहे का, असा प्रश्नही उपस्थित केला गेला. कदाचित चौकशीत अशा काही लोकांची नावे येऊ शकतात, ज्यामुळे अमेरिकेतील राजकीय गोंधळ वाढू शकतो. अमेरिकन न्याय विभाग आणि ‘सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज कमिशन’ अनेक प्रकरणांची चौकशी करत आहेत. हिंडेनबर्ग अहवालाद्वारे भारतातील केंद्र सरकार, सर्वोच्च न्यायालय आणि ‘सेबी’ला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न का करण्यात आला, असा प्रश्न उपस्थित होतो. याद्वारे लाखो भारतीयांची अब्जावधी रुपयांची फसवणूक करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा ठपकाही ठेवण्यात आला. केंद्रात सत्तेत असलेल्या भाजपने तर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अदानी समूहावरील हल्ले केवळ नफ्यासाठी नव्हते, तर भारतात अस्थिरता निर्माण करण्याचे षड्यंत्र असल्याचा आरोप केला आहे.

यासंदर्भात बांगलादेश आणि श्रीलंकेची उदाहरणे सर्वांसमोर आहेत. ट्रम्प सत्तेवर आल्यानंतर अमेरिका जगाशी आर्थिक संबंधांवर लक्ष केंद्रित करेल असे म्हटले जात आहे. भारतासह इतर देशांमध्ये टेस्ला आणि इतर अमेरिकन कंपन्यांचा व्यवसाय वाढवण्यामागील छुपा हेतू नाकारता येत नाही. कारण काहीही असो; पण जागतिक व्यासपीठावर अशा संघटनांबाबत ठोस कायदे आणि नियम बनवले पाहिजेत. ‘हिंडेनबर्ग रिसर्च फर्म’ बंद करण्यात गौतम अदानी यांचा मोठा हात असल्याचा दावा केला जात आहे. दावेदार म्हणत आहेत की ‘हिंडेनबर्ग रिसर्च फर्म’ने अदानी यांना उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न केला, मात्र आपल्या आंतरराष्ट्रीय संबंधांचा आणि प्रभावाचा वापर करून अदानी यांनी ‘हिंडेनबर्ग रिसर्च फर्म’ बंद केली आहे. अदानींना नष्ट करण्याच्या प्रयत्नात ‘हिंडेनबर्ग’ इतिहासजमा झाली. ‘हिंडेनबर्ग’ने अदानी यांच्या अदानी इंडस्ट्रीज ग्रुपबाबत एक खळबळजनक अहवाल प्रसिद्ध केला होता. ‘हिंडेनबर्ग’च्या अहवालाने संपूर्ण जगात खळबळ उडाली.

नेट अँडरसन हे ‘हिंडेनबर्ग रिसर्च फर्म’चे संस्थापक. त्यांनी २०१७ मध्ये ‘हिंडेनबर्ग रिसर्च ही शॉर्ट सेलिंग फर्म’ सुरू केली. ट्रम्प यांनी पदभार स्वीकारण्यापूर्वी कंपनी बंद करण्याचे कोणतेही विशिष्ट कारण अँडरसन यांनी दिले नाही. तथापि, टीकाकारांचा दावा आहे की ‘हिंडेनबर्ग’चे जॉर्ज सोरोसशी असलेले संबंध आणि येणाऱ्या ट्रम्प प्रशासनाकडून ‘डीप स्टेट’वर दबाव हे प्रमुख घटक आहेत. ‘हिंडेनबर्ग’ने आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक कंपन्या बुडवल्या. ‘हिंडेनबर्ग’ने २०१७ ते २०२४ या कालावधीत अनेक अहवाल सादर करून आंतरराष्ट्रीय पातळीवर खळबळ उडवून दिली. आतापर्यंत त्यांनी लक्ष्य केलेल्या प्रमुख कंपन्यांमध्ये लॉर्डस्टाउन मोटर्स कॉर्प (अमेरिका), कँडी (चीन), क्लोव्हर हेल्थ (अमेरिका) आणि टेक्नोलॉस (कोलंबिया) यांचा समावेश आहे. या काळात गौतम अदानी, जॅक डोर्सी आणि कार्ल इकानसारख्या जगातील आघाडीच्या अब्जाधीश उद्योगपतींना सर्वात जास्त नुकसान सहन करावे लागले. ‘हिंडेनबर्ग’च्या कामामुळे जवळजवळ शंभर लोकांवर नियामकांनी आरोप लावले आणि चौकशी केली, असे अँडरसन यांनी लिहिले. अँडरसन म्हणाले की, कंपनीच्या शेवटच्या काही प्रकल्पांवर काम केल्यानंतर आणि संशयास्पद पाँझी योजनांबाबत नियामकांना पुरावे सादर केल्यानंतर ते कंपनी बंद करत आहेत. त्यांनी स्पष्ट केले की हिंडेनबर्ग रिसर्च फर्म बंद करणे हा त्यांचा वैयक्तिक निर्णय होता. ‘हिंडेनबर्ग रिसर्च’ने अनेक मोठ्या कंपन्यांविरुद्ध गंभीर आर्थिक अनियमिततेचे आरोप केले होते. यामध्ये भारतातील अदानी ग्रुप आणि अमेरिकेतील इकान एंटरप्रायझेस यांचा समावेश आहे. ‘हिंडेनबर्ग रिसर्च’च्या अहवालामुळे या कंपन्यांचे अब्जावधी डॉलर्सचे नुकसान झाले. ‘हिंडेनबर्ग रिसर्च’चा अहवाल बाहेर आला, तेव्हा गौतम अदानी हे जगातील चौथ्या क्रमांकाचे श्रीमंत व्यक्ती होते; परंतु अहवाल समोर आल्यानंतर समूहाच्या सर्व सूचीबद्ध कंपन्यांचे शेअर्स झपाट्याने घसरले. त्यावेळी अदानी हे टॉप २० श्रीमंतांच्या यादीतूनही बाहेर होते. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये ‘सेबी’च्या प्रमुख माधवी बूच आणि त्यांचे पती धवल बूच यांची अदानी समूहाशी संबंधित एका ऑफशोअर कंपनीत हिस्सेदारी आहे, असा आरोप हिंडेनबर्ग यांनी केला. मीडिया आणि व्यावसायिक जगात ‘हिंडेनबर्ग’च्या बातम्या खूप गांभीर्याने घेतल्या जात होत्या.


# कर्करोग : प्रतिबंधात्मक आजार!

**(४ फेब्रुवारी: जागतिक कर्करोग दिन विशेष)**

आपण डाक्टर वगैरे काही नसलो तरी समाजाला काहीतरी देणेकरी लागतो, म्हणूनच हा छोटा-सा खारीचा वाटा. कर्करोगाविषयी जनजागृती करण्याकरिता ४ फेब्रुवारी हा दिवस जागतिक कर्करोग दिवस म्हणून साजरा केला जातो. कर्करोगाबाबत माहितीचा प्रसार करणे आणि कर्करोग प्रतिबंधात्मक उपाययोजनांना प्रोत्साहन देणे हे जागतिक कर्करोग दिवस साजरा करण्यामागील उद्दिष्ट आहे. पॅरिस येथे सन २०००मध्ये झालेल्या जागतिक परिषदेत कर्करोगविषयक मसुदा मांडण्यात आला. अशा प्रकारचा विषय हाताळणारी ही पहिलीच परिषद ठरली. या परिषदेत जगभरातील शासकीय उच्चपदस्थ अधिकारी आणि कर्करोगविषयक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. सदर बोधप्रद संकलित लेख श्रीकृष्णकुमार लक्ष्मी-गोविंदा निकोडे गुरूजींच्या शब्दांतून जरुर वाचा... संपादक.

जागतिक कर्करोग दिन हा दि.४ फेब्रुवारी रोजी कर्करोगाविषयी जागरुकता वाढवण्यासाठी आणि त्याचे प्रतिबंध, शोध आणि उपचारांना प्रोत्साहन देण्यासाठी आंतरराष्ट्रीय दिवस आहे. जागतिक कर्करोग दिन सन २००८मध्ये लिहिलेल्या जागतिक कर्करोग घोषणेच्या उद्दिष्टांना पाठिंबा देण्यासाठी युनियन फॉर इंटरनॅशनल कॅन्सर कंट्रोलच्या नेतृत्वात आहे. जागतिक कर्करोग दिनाचे प्राथमिक उद्दिष्ट कर्करोगामुळे होणारे आजार आणि मृत्यू लक्षणीयरीत्या कमी करणे, हे आहे आणि कॅन्सरपासून बचाव करता येणाऱ्या पीडितांवर होणारा अन्याय दूर करण्यासाठी आंतरराष्ट्रीय समुदायाला एकत्र आणण्याची ही एक संधी आहे. हा दिवस संयुक्त राष्ट्रसंघाद्वारे पाळला जातो. जागतिक कर्करोग दिन चुकीच्या माहितीला लक्ष्य करतो, जागरूकता वाढवतो आणि कलंक कमी करतो. जागतिक कर्करोग दिनानिमित्त कर्करोगाने प्रभावित झालेल्यांना पाठिंबा दर्शवण्यासाठी अनेक उपक्रम राबवले जातात. यापैकी एक चळवळ आहे ञ्ो हेअर सेल्फी, कर्करोगावर उपचार घेत असलेल्यांसाठी धैर्याचे प्रतीक दर्शविण्यासाठी ‘केशकर्तनकर्त्यांनी‘ त्यांचे डोके शारीरिक किंवा अक्षरशः मुंडन करण्याची जागतिक चळवळ आहे. सहभागींच्या प्रतिमा नंतर सर्व सोशल मीडियावर शेअर केल्या जातात. जगभरात शेकडो कार्यक्रमही होतात.

जागतिक कर्करोग दिनाची स्थापना




दि.४ फेब्रुवारी २००० रोजी पॅरिस येथे झालेल्या न्यू मिलेनियमसाठी कर्करोग विरुद्धच्या जागतिक कर्करोग शिखर परिषदेत करण्यात आली. पॅरिस अगेन्स्ट कॅन्सरची सनद, जी संशोधनाला चालना देण्यासाठी, कर्करोग रोखण्यासाठी, रूग्ण सेवा सुधारण्यासाठी तयार करण्यात आली होती, त्यामध्ये दस्तऐवजाच्या अधिकृत स्वाक्षरीची वर्धापनदिन जागतिक कर्करोग दिन म्हणून स्थापित करणारा लेख देखील समाविष्ट होता, त्यावर तत्कालीन जनरल यांनी समिटमध्ये स्वाक्षरी केली होती. कर्करोगाविषयी जनजागृती करण्याकरिता ४ फेब्रुवारी हा दिवस जागतिक कर्करोग दिवस म्हणून साजरा केला जातो. कर्करोगाबाबत माहितीचा प्रसार करणे आणि कर्करोग प्रतिबंधात्मक उपाययोजनांना प्रोत्साहन देणे हे जागतिक कर्करोग दिवस साजरा करण्यामागील उद्दिष्ट आहे. पॅरिस येथे सन २०००मध्ये झालेल्या जागतिक परिषदेत कर्करोगविषयक मसुदा मांडण्यात आला. अशा प्रकारचा विषय हाताळणारी ही पहिलीच परिषद ठरली. या परिषदेत जगभरातील शासकीय उच्चपदस्थ अधिकारी आणि कर्करोगविषयक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यांनी पॅरिसच्या कर्करोगविषयक सनदेला मान्यता दिली. प्रस्तुत सनद कर्करोगसंबंधित संशोधन आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना याकरिता आर्थिक गुंतवणूक करणे, कर्करोगग्रस्त रूग्णांचे जीवनमूल्य उंचावणे तसेच त्यांना योग्य उपचार देणे अशा तत्त्वांचा पुरस्कार करते. सनदेच्या दहाव्या कलमात अधिकृतरीत्या ४ फेब्रुवारी हा दिवस जागतिक कर्करोग दिवस म्हणून जाहीर केला गेला.

कर्करोगविषयक उपलब्ध माहिती तसेच कर्करोगाचे निदान आणि उपचार यांत झालेली लक्षणीय प्रगती यांमुळे रोगप्रसारामध्ये कपात होणे अपेक्षित आहे. परंतु जागतिक आकडेवारीनुसार दरवर्षी कर्करोगाचे नव्याने निदान होणाऱ्या रूग्णांच्या संख्येत भर पडत आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, कर्करोगाच्या माहितीचा प्रसार करून कर्करोगाने होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण कमी करता येऊ शकते. यासाठी कर्करोग प्रतिबंधात्मक उपायांविषयी जागरूकता वाढविण्याच्या उद्देशाने जगभरातील कर्करोग संस्था आणि आरोग्य संघटना जागतिक कर्करोग दिवस साजरा करतात. कर्करोगामुळे होणाऱ्या मृत्यूंपैकी सुमारे ७० टक्के मृत्यू हे अल्पविकसित देशांमध्ये होत असल्याकारणाने अशा ठिकाणी कर्करोग आणि त्याचा प्रतिबंध याबद्दल जनजागृती करण्यासाठी जागतिक कर्करोग दिवस हे एक महत्त्वाचे साधन आहे. आंतरराष्ट्रीय कर्करोग नियंत्रण संघटना- युनियन फॉर इंटरनॅशनल कॅन्सर कंट्रोल- यूआईसीसी ही संस्था आंतरराष्ट्रीय पातळीवर कर्करोगावर नियंत्रण राखण्यासाठी आणि पर्यायाने जागतिक आरोग्य सुधारण्यासाठी कार्यशील असते. आंतरराष्ट्रीय कर्करोग नियंत्रण संघटना, जागतिक आरोग्य संघटना आणि इतर आंतरराष्ट्रीय संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक कर्करोग दिवसाचे आयोजन केले जाते. प्रत्येक वर्षी आंतरराष्ट्रीय कर्करोग नियंत्रण संघटना जागतिक कर्करोग दिवसानिमित्त कर्करोगाशी निगडित रूपरेखा-थीम्स जाहीर करते. या रूपरेखेला अनुसरून विविध आरोग्य संस्था आणि कर्करोग उपचार केंद्र यांद्वारे शैक्षणिक उपक्रम राबवले जातात. या संस्थांद्वारे त्यांच्या संकेतस्थळांवर कर्करोगाविषयी माहिती प्रसारित केली जाते. आंतरराष्ट्रीय कर्करोग नियंत्रण संघटना स्थानिक आरोग्य संस्थांच्या साहाय्याने संमेलने, व्याख्याने, प्रदर्शने तसेच निधी उभारणी कार्यक्रम यांचे आयोजन केले जाते. काही देशांमध्ये आकाशवाणी आणि दूरदर्शन या माध्यमांद्वारे ४ फेब्रुवारी किंवा त्या आठवड्यात कर्करोगविषयक विशेष कार्यक्रम प्रसारित केले जातात.



- संकलन व शब्दांकन -
**श्री एन. के. कुमार**
जी. से.नि.अध्यापक.
गडचिरोली मोबा-
७७७५०४१०८६.

जागतिक कर्करोग दिवसानिमित्त सामूहिक आणि वैयक्तिक प्रयत्नांतून कर्करोगाचा जनजीवनावरील परिणाम कमी करता येऊ शकतो, या आशयाशी संलग्न रूपरेखा आखण्यात आली. तसेच कर्करोगाबाबत गैरसमज दूर करणे; कर्करोग हा प्रतिबंधात्मक आजार आहे; कर्करोगाविषयी वैयक्तिक बांधीलकी, अशा विविध विषयांना अनुसरून देखील रूपरेखा योजण्यात येतात. भारतामध्ये सन २०१४ पासून ७ नोव्हेंबर यादिवशी राष्ट्रीय कर्करोग जनजागृती दिवस साजरा करण्यात येतो.

!! जागतिक कर्करोग दिनानिमित्त सर्वांना दक्षतावर्धक हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

# महाराष्ट्र लिहिता-वाचता न येणाऱ्यांचे राज्य होऊ द्यायचे का?

विद्यापीठे, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था व शिक्षक प्रशिक्षण संस्था यांच्या साहाय्याने ‘प्रथम एज्युकेशन फाउंडेशन’ने केलेला ‘अॅन्युअल स्टेटस ऑफ एज्युकेशन’ (‘असर’) सर्वेक्षण अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला. कोविड साथकाळानंतरच्या असर सर्वे क्षण अहवालातून पुढे आलेल्या स्थितीपेक्षा या वर्षी महाराष्ट्रातील शालेय विद्यार्थ्यांची गुणवत्ता फारच खालावल्याचे अहवालातून स्पष्ट होते. कारण ज्या विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण झाले आहे त्यातील निम्म्या विद्यार्थ्यांना गणिती क्रिया करता येत नाहीत. ११ ते ९९ अंक आठवीच्या विद्यार्थ्यांना ओळखता व वाचता येत नाहीत. अगदी साध्या साध्या मूलभूत क्रिया, वाचन, अंकगणित हेही विद्यार्थ्यांना जमत नसल्याचे हा अहवाल दर्शवितो. असर अहवालामुळे महाराष्ट्राचे शैक्षणिक वास्तव समोर आले आहे. ‘असर’ने महाराष्ट्रातील ६०५ जिल्ह्यांतील १७ हजार ९९७ गावांतील तीन लाख ५२ हजार २८ घरांचा आणि त्यातील वय वर्षे तीन ते १६ या गटातील सहा लाख ४९ हजार ४९१ विद्यार्थ्यांचा अभ्यास, सर्वेक्षण करून हा अहवाल सादर केला आहे. अहवाल संपूर्ण देशाचा आहे. त्यामधील महाराष्ट्राच्या शैक्षणिक दुर्दशेचा गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे.

‘असर’ म्हणजे वार्षिक स्थिती शिक्षण अहवाल. हे मुलांच्या शालेय शिक्षण आणि अध्ययनाच्या स्थितीचे देशव्यापी घरगुती सर्वे क्षण आहे. तीन ते १६ वर्षे वयोगटातील मुलांसाठी शालेय स्थितीची नोंद केली जाते आणि पाच ते १६ वर्षे वयोगटातील मुलांची मजकूर वाचण्याची आणि मूलभूत अंकगणित करण्याची क्षमता तपासली जाते. तसेच शिक्षण प्रणाली बळकट करणे, शिक्षकांची क्षमता वाढवणे आणि शिकण्याचे परिणाम सुधारणे यासारख्या उद्दिष्टांवर असर काम करते. असरने २०१७ मध्ये १४ ते १८ वर्षे वयोगटातील तरुणांच्या वास्तविक जीवनातील संदर्भात मूलभूत साक्षरता आणि संख्याशास्त्र लागू करण्याच्या क्षमतेचे सर्वेक्षण केले. २०१९ मध्ये चार ते आठ वर्षे वयोगटातील मुलांचे संज्ञानात्मक, प्रारंभिक भाषा आणि संख्या कौशल्यांच्या आधारे मूल्यांकन करण्यात आले आणि २०२३ मध्ये डिजिटल साक्षरता आणि स्मार्टफोन वापर या मुद्द्यावर मूल्यमापन करण्यात आले. आताचे सर्वेक्षण मूलभूत वाचन आणि अंकगणित कौशल्यांविषयीचे आहे.

**‘आप’ चौथ्यांदा, की: भाजपला ३१ वर्षांनी संधी?**

पहिली ते दहावीतील विद्यार्थ्यांनी अवगत केलेल्या भाषिक आणि गणिती कौशल्यांच्या पाहणीवर जास्त भर या सर्वेक्षणात देण्यात आला आहे. तिसरीच्या ६३ टक्के मुलांना तर सहावी ते आठवीच्या ३० टक्के विद्यार्थ्यांना दुसरीचे मराठी पुस्तक वाचता येत नाही. सर्वे क्षणात विद्यार्थ्यांना मराठी परिच्छेद, सोपे शब्द, सोपी वाक्ये वाचता आली नाहीत तर ३.६ टक्के विद्यार्थ्यांना अक्षरे ओळखता आली पण शब्द वाचता आले नाहीत. या पेक्षा भयंकर म्हणजे १.७ टक्के विद्यार्थ्यांना अक्षरेही ओळखता येत नसल्याचे विदारक चित्र दिसले.

गणिती कौशल्यांची स्थिती भाषिक कौशल्यांपेक्षाही भयानक आहे. पाच ते १६ वयोगटातील निम्म्याहून अधिक विद्यार्थ्यांना अंकगणित जमत नाही. १ ते ९ हे अंक, ११ ते ९९ पर्यंतच्या संख्या विद्यार्थी ओळखू शकतात का, याचा अभ्यास करण्यात आला. दोन अंकी संख्येची वजाबाकी, भागाकार या पद्धतीने अंकगणितातील सर्वेक्षण झाले. त्यात आठवीच्या ६५.८ टक्के तर पाचवीच्या ६९.४ टक्के विद्यार्थ्यांना ११ ते ९९ हे अंक ओळखताही येत नसल्याची धक्कादायक माहिती या शैक्षणिक स्थितीच्या वार्षिक अहवालातून समोर आली.

पाचवीतील केवळ २८.३ टक्के विद्यार्थ्यांना तर २७ टक्के विद्यार्थिनींना भागाकार येतो. तोच भागाकार आठवीतील ३३.९ टक्के मुले आणि ३८.७ टक्के विद्यार्थिनींना येतो. म्हणजे मूलभूत वाचन आणि अंकगणित क्षमतेची समस्या आजही महाराष्ट्रात व्यापक प्रमाणात दिसून येते. अकरावी, बारावी व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची परिस्थिती यापेक्षा भयंकर आहे. विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना विषयाचे स्पेलिंग लिहिता येत नाही.

मराठीमधील मात्रा, उकार, वेलांटी समजत नाही. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना साधे साधे फॉर्म भरता येत नाहीत. मग याला जबाबदार कोण? शासन म्हणते शिक्षक तर शिक्षक म्हणतात शासन. खरे तर शासनाचे कोणतेच सर्वेक्षण शिक्षकांशिवाय पूर्ण होत नाही. शिक्षकांना वारंवार शालाबाह्य कामे दिली जातात. आता, ताबडतोब ऑनलाईन माहिती भरा म्हणून सांगितले जात असेल, तर शिक्षकांनी शिकवायचे कधी? विद्यार्थ्यांना नापास करू नये, असे शासनाचे धोरण आहे. परंतु आज दहावी, बारावी उत्तीर्ण झालेल्या व पदवी प्राप्त केलेल्याही अनेक मुलांना मराठी नीट वाचता येत नाही. अंकगणितातील गुणाकार भागाकार येत नाहीत. लगेच मोबाईलमधील कॅल्क्युलेटर काढतात. ही परिस्थिती आज आहे.

**शुद्ध हवा’ नावडे दिल्लीकरांना:**

असरच्या सर्वेक्षणात एक चांगली गोष्ट आढळून आली ती म्हणजे ६३.३ टक्के विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक बाबींसाठी स्मार्टफोनचा वापर होत आहे. परंतु स्मार्टफोन वापरामुळे उद्भवणाऱ्या सुरक्षेच्या प्रश्नांबाबत हे विद्यार्थी अनभिज्ञ आहेत. हे विद्यार्थी समाजमाध्यमांचा मोठ्या प्रमाणात वापर करतात, पण ही माध्यमे वापरताना कोणती काळजी घ्यावी, याविषयी ते पुरेसे जागरुक नसतात.

मुलांना मूलभूत वाचन करता यावे आणि अंकगणित कौशल्ये संपादन करता यावीत, यासाठी प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था चांगली असणे गरजेचे आहे. त्यासाठी शासनाने व शिक्षकांनी ठोस पावले उचलली पाहिजेत, अन्यथा वर्षानुवर्षे अशाच अहवालांना सामोरे जात राहावे लागेल. राज्याला लाभलेला शिक्षणाचा समृद्ध वारसा पुढे न्यायचा की, महाराष्ट्राची लिहिता वाचता न येणाऱ्यांचे राज्य अशी अवस्था होऊ द्यायची, हे लवकरात लवकर ठरवावे लागेल.

**-प्रा. शिवाजी तात्यासाहेब काटकर**
(लेखक महाराष्ट्र शासनाचा ‘आदर्श शिक्षक पुरस्कार’प्राप्त शिक्षक असून शैक्षणिक व सामाजिक विषयांवर लेखन करतात)

# राज्यात १.९४ लाख विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांची होणार नियुक्ती, ३३ टक्के महिलांची नियुक्ती

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महाराष्ट्रात आता प्रत्येक पाचशे मतदारांमागे कार्यकारी अधिकारी राहणार असून, याप्रमाणे राज्यभरात सुमारे १ लाख ९४ हजार विशेष कार्यकारी अधिकारी जिल्ह्यात नियुक्त करणार असून प्रत्येक ठिकाणी ३३ टक्के महिलांची नियुक्ती करण्यात येणार असल्याची माहिती विशेष कार्यकारी अधिकारी राज्य निवड समितीचे अध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

महाराष्ट्र सरकारने सोमवारी विशेष कार्यकारी अधिकारी नियुक्ती संदर्भातील सुधारित शासन आदेश जारी केला. त्यानुसार राज्य स्तरावर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे या समितीचे अध्यक्ष आहेत. जिल्हा पातळीवर पालकमंत्री सदस्य व जिल्हाधिकारी सदस्य सचिव म्हणून काम पाहणार आहेत. आजच्या सुधारित जीआरमुळे आतापर्यंत पदावर असलेल्या विशेष कार्यकारी अधिकारीचे पद तात्काळ प्रभावाने नाहीसे होणार आहे.

महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले की, हे विशेष कार्यकारी अधिकारी शोभेचे पद नसणार नाही. तर त्यांना १३ ते १४ विशेष अधिकार देण्यात येणार आहेत. आतापर्यंत प्रत्येक १००० मतदारांमागे एक विशेष कार्यकारी अधिकारी असायचा मात्र आता राज्य सरकारने नवा जीआर काढून प्रत्येक ५०० मतदारांमागे एक विशेष कार्यकारी अधिकारी नेमण्याचा निर्णय घेतल्याने मोठ्या संख्येने विशेष कार्यकारी अधिकारी राज्यात नेमले जाणार आहे. लवकरच प्रत्येक जिल्ह्यातल्या निवड समितीच्या माध्यमातून नव्या विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांची निवड व नेमणूक केली जाणार.

अनेक महत्त्वाच्या विषयांमध्ये, विकासाच्या विषयांमध्ये, दक्षता समितीमध्ये विशेष कार्यकारी अधिकारी काम करणार असून, विशेष कार्यकारी अधिकारी शासनाच्या विविध योजनांमध्ये सहकारी म्हणून काम करणार आहे. प्रशासन आणि पोलिसांशी समन्वय साधणार आहे. या पदावरील नियुक्तीसाठी किमान दहावी उत्तीर्ण असावे लागेल.वय २५ वर्षांपेक्षा जास्त आणि ६५ पेक्षा कमी असावे. शासकीय योजनांसाठी ज्या काही प्रमाणपत्र लागतात ते प्रमाणपत्र देण्याचा अधिकार या विशेष कार्यकारी अधिकारी यांना असेल तसेच विविध समित्यांमध्ये त्यांना स्थान मिळेल.. सरकारच्या विविध कामांवर लक्ष घालण्याचे अधिकार त्यांना असेल.

सुधारित निर्णय सरकारने केला असून, आता सरकारी सेवा व सुविधांसाठी लागणारी कागदपत्रे सुलभपणे मिळतील. जेणेकरून सरकार आपल्या दारी असल्याचे दिसून येईल. विशेष कार्यकारी अधिकारी नेमताना महिला वर्गाला महत्त्वपूर्ण स्थान देण्यात आले आहे. यामध्ये ३३ टक्के महिलांची नियुक्ती करण्यात येईल. तसेच राज्य सरकारच्या महत्वाच्या पाच पुरस्कार विजेत्यांनाही या पदावर नेमले जाणार आहे. या पदावरील व्यक्तीचा कालावधी ५ वर्षांचा असेल. तसेच ग्रामसभेत या अधिकाऱ्यांना विशेष निमंत्रित केले जाईल असे बावनकुळे यांनी सांगितले.

# इंग्रजांचा कर्दनकाळ : उमाजीराजे नाईक

**क्रांतिवीर राजे उमाजी नाईक हे भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी ब्रिटिशांविरुद्ध लढणारे महाराष्ट्रातील प्रथम आद्यक्रांतिकारक होते. आज ३ फेब्रुवारी हा या महान आद्यक्रांतिकाराचा स्मृतिदिन. रामोशी-बेरड समाजाशिवाय कोणाच्याच नेहमीप्रमाणे तो लक्षात राहत नाही. त्यामुळे राजे उमाजी नाईक फक्त रामोशी-बेरड समाजापुरते मर्यादित असल्यासारखे होत आहे. पण सर्व जाती-धर्मांनी हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे. ही आठवण करून देणारा श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजींचा हा संकलित लेख... संपादक.**

क्रांतिकारकांचा आदर आणि त्यांचे स्मरण सर्वच जातिधर्मातील लोकांनी केले पाहिजे. मग हे राजे उमाजी नाईक असे उपेक्षितच का राहून गेले? हे आश्चर्य आहे. अशा या धाडसी उमाजीराजेंनंतर तब्बल १३ वर्षांनी- सन १८४५ला क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके जन्माला आले. त्यांनी उमाराजेंचे धोरण डोळ्यासमोर ठेवत ३०० रामोशांना सोबत घेऊन बंड सुरू केले. त्यावेळी दौलती रामोशी हा त्या बंडाचा सेनापती होता. नरवीर उमाजीराजे स्वतःच्या कार्याने एक दीपस्तंभ ठरले आहेत. त्यांचा गौरव करण्यापासून इंग्रज अधिकारीही स्वतःला रोखू शकले नाहीत. इंग्रज अधिकारी कॅप्टन रॉबर्टसन याने १८२०ला ईस्ट इंडिया कंपनीला लिहिताना म्हटले, 'उमाजीचा रामोशी समाज इंग्रजांविरुद्ध तिरस्काराने पेटला असून तो कोणत्या तरी राजकीय बदलाची वाट पाहत आहे. जनता त्यांना मदत करत असून कोणी सांगावे, हा उमाजी राजा होऊन छ.शिवाजीसारखे राज्य तर स्थापणार नाही ना?' तर मॉकिनटॉस म्हणतो, 'उमाजीपुढे छ.शिवरायांचा आदर्श होता. त्याला फाशी दिली नसती तर तो दुसरा शिवाजी झाला असता.' हे केवळ गौरवोद्गार नसून हे सत्य आहे... जर इंग्रजांनी कूटनीती आखली नसती तर कदाचित तेव्हाच भारताला स्वातंत्र्य मिळाले असते. भारताच्या इतिहासात अनेक ऐतिहासिक घटना घडल्या आहेत. काहींची नोंद झाली, काहींची दखलच घेण्यात आली नाही. सन १८५७च्या उठावापूर्वीही अनेक उठाव झाले. अशाच पहिल्या उठावाद्वारे इंग्रजांना सलग १४ वर्षे सळो की पळो करून सोडणारे व सर्व प्रथम क्रांतीचे स्वप्न पाहणारे महाराष्ट्रातील निधड्या छातीचे वीर आद्यक्रांतिकारक नरवीर ठरले गेले. ज्यांना इंग्रजांचा कर्दनकाळ म्हणूनही ओळखले जाते. ते म्हणजे राजे उमाजी नाईक!

नरवीर उमाजीराजे नाईक-खोमणे यांचा जन्म रामोशी-बेरड समाजात लक्ष्मीबाई व दादोजी खोमणे यांच्या पोटी दि.७ सप्टेंबर १७९१ रोजी पुणे जिल्ह्यातील किल्ले पुरंदर येथे झाला. वडिल दादोजी खोमणे पुरंदर किल्ल्याचे वतनदार होते. त्यामुळे उमाजीराजेंचे कुटुंब पुरंदर व वज्रगड किल्ल्याच्या संरक्षणाची जबाबदारी पार पाडत होते. त्यामुळेच त्यांना नाईक ही पदवी मिळाली होती. उमाजीराजे जन्मापासूनच हुशार, चंचल, शरीराने धडधाकट, उंचपुरे आणि करारी होते. त्यांनी पारंपरिक रामोशी हेर कला लवकरच आत्मसात केली. जसे राजे मोठे होत गेले, तसे त्यांनी वडीलांकडून दांडपट्टा, तलवार, भाला, कुऱ्हाड, तीरकमठा, गोफण वगैरे चालवण्याची कला अवगत केली. या काळात इंग्रजांनी भारतात आपली सत्ता स्थापन करण्यास सुरूवात केली होती. हळूहळू मराठी मुलुख जिंकत त्यांनी पुणे ताब्यात घेतले. इ.स.१८०३मध्ये पुण्यात दुसऱ्या बाजीराव पेशव्यास स्थानापन्न केले आणि त्याने इंग्रजांचा पाल्य म्हणून काम सुरू केले. सर्वप्रथम त्याने इतर सर्व किल्ल्यांप्रमाणे पुरंदर किल्ल्याच्या वतनदारीचे व संरक्षणाचे काम रामोशी समाजाकडून काढून घेऊन आपल्या मर्जीतील लोकांकडे दिले. त्यामुळे रामोशी समाजावर उपासमारीची वेळ आली. जनतेवर इंग्रजी अत्याचार वाढू लागले. अशा परिस्थितीत करारी उमाजीराजे बेभान झाले. छत्रपती शिवरायांना श्रद्धास्फूर्तीचे स्थान देत त्यांचा आदर्श घेतला. स्वतःच्या अधिपत्याखाली स्वराज्याचा पुकार करत आपल्या देशावर परकीयांना राज्य करू देणार नाही, असा पण केला. विठोजी नाईक, कृष्ण नाईक, खुशाबा रामोशी, बाबू सोळस्कर यांना बरोबर घेऊन कुलदैवत जेजुरीच्या श्री खंडोबारायाला भंडारा उधळत शपथ घेतली व इंग्रजांविरोधात पहिल्या बंडाची गर्जना केली.

उमाजीराजे नाईक यांनी इंग्रज, सावकार, मोठे वतनदार अशा लोकांना लुटून गोरगरिबांना आर्थिक मदत करण्यास सुरवात केली. कोणत्याही स्त्रीवर अत्याचार- अन्याय झाल्यास ते भावासारखे धावून जाऊ लागले. इंग्रजांना त्रास दिल्यामुळे त्यांना सरकारने इ.स.१८१८मध्ये एक वर्ष तुरुंगवासाची शिक्षा दिली. परंतु तो काळ सत्कारणी लावत ते तुरंगातच लिहिणे-वाचणे शिकले. या घटनेचे इंग्रज आधिकारी कॅप्टन मॉकिनटॉस याने फार आश्चर्य व कौतुक केले. तुरूंगातून सुटल्यानंतर इंग्रजांविरुद्ध त्यांच्या कारवाया आणखी वाढल्या. ते देशासाठी लढत असल्याने जनताही त्यांना साथ देऊ लागली. त्यामुळे इंग्रज मेटाकुटीला आले. त्यांना पकडण्यासाठी इंग्रज अधिकारी मॉकिनटॉस याने सासवड-पुरंदरच्या मामलेदारास फर्मान सोडले. मामलेदार इंग्रजी सैन्य घेऊन पुरंदरच्या पश्चिमेकडील एका खेड्यात गेला असता, तेथे त्यांच्यात आणि उमाजीराजेंच्या सैन्यात तुंबळ युद्ध झाले. यात इंग्रजांना पराभव स्वीकारावा लागला. उमाजीराजेंचे सैन्य डोंगरात टोळ्या करून राहत असत. एका सैन्य तुकडीत जवळजवळ ५ हजार सैनिक होते.

इंग्रजांसारख्या बलाढ्य शत्रुशी मुकाबला करायचा म्हणजे मोठे मनुष्यबळ असायला हवे. म्हणजेच सैन्य व प्रचंड खर्च आलाच. पण उद्देश महान असल्यामुळे ते साधनाअभावी थांबले नाहीत. ते छ.शिवाजी महाराजांना आदर्श मानत. असे खुद्द इंग्रज आधिकारी कॅप्टन मॉकिनटॉस याने नमूद केले आहे. दि.२४ फेब्रुवारी १८२४ला नरवीर उमाजींनी भाबुद्री येथील इंग्रज खजिना लुटून तो देवळाच्या देखभालीसाठी जनतेला वाटला होता. दि.२२ जुलै १८२६ साली त्यांचा राज्याभिषेक कडेपठार, जेजुरी या ठिकाणी करण्यात आला. त्यांनी छत्रचामर, अबदागीर, इ.राजचिन्हे धारण केली. दरबारात ते भिक्षुक-पुजारी यांना दक्षिणा व गोरगरिबांना दान देत असत. त्यांनी विभागनिहाय सैन्य प्रमुख व त्यांच्या तुकड्या नेमून सर्व भागात त्या तैनात केल्या होत्या. त्यांना कामे वाटून दिली होती. तसेच त्यांनी एकमेकांशी संपर्क, दळणवळण, इंग्रजांच्या बातम्या तसेच लोकांचा बातम्या, इ.कामासाठी हेरखातेही निर्माण केले होते. विभागनिहाय गुप्तहेरखाते नेमले होते. सैन्यात व गुप्तहेरखात्यात सर्व जाती-धर्माचे लोक होते. त्याच साली २८ ऑक्टोबरला त्यांच्याविरुद्ध इंग्रजांनी पहिला जाहिरनामा प्रसिद्ध केला. त्यात उमाजीराजे व त्यांचा साथीदारांना पकडणाऱ्यास मोठ्या रकमेची बक्षिसे व इनाम जाहिर केले. या क्रांतिकारकांना मदत करणाऱ्यास शिक्षाही जाहीर केली. पण जनतेने इंग्रजांना मदत केली नाही. यातून उमाजीराजेंची लोकप्रियता दिसून येते. अशाच प्रकारे दुसरा जाहिरनामा इंग्रजांनी दि.८ ऑगस्ट १८२७ साली प्रसिद्ध केला. त्यात बक्षिसाची रक्कम वाढवली व शरण येणाऱ्यास माफी देण्याचे अभिवचन देण्यात आले. तरीही कोणी मदत केली नाही. कारण लोक उमाजीराजेंना इंग्रजांविरुद्ध एक आशास्थान म्हणून पाहू लागले होते. पुढे २० डिसेंबरला झालेल्या युद्धात इंग्रजांना पराभव पत्करावा लागला. उमाजीराजेंनी ५ इंग्रज सैनिकांची मुंडकी कापून मामलेदाराकडे खलिता म्हणून पाठवली. त्यामुळे इंग्रज चांगलेच धास्तावले. कॅप्टन डेव्हिसपासून लेफ्टनंटपर्यंत सर्वच लालबुंद झाले. नंतर ३० नोव्हेंबरला इंग्रजांना त्यांनी ठणकावून सांगितले की, आज हे एक बंड असले तरी असे हजारो बंड सातपुड्यापासून सह्याद्रीपर्यंत उठतील व तुम्हास जेरीस आणतील. फक्त इशारा देऊन न थांबता त्यांनी इंग्रजांना सळो की पळो करून सोडले. इंग्रजांनी तिसरा जाहिरनामा प्रसिद्ध करून बक्षिसाची रक्कम दुप्पट केली. त्याचाही काही उपयोग झाला नाही. जंजिऱ्याचा सिद्दी नवाबने उमाजीराजे कोकणात गेले असताना त्यांना मदत मागितली होती. दि.२४ डिसेंबर १८३०ला त्यांनी आपला पाठलाग करणाऱ्या इंग्रज अधिकारी बॉईड आणि त्याच्या सैन्यावर मांढरदेवी गडावरून बंदुका, गोफणी चालवत घायाळ करून परत पाठवले होते. त्यात काहींचे प्राणही घेतले. दि.२६ जानेवारी १८३१ साली इंग्रजांनी चौथा जाहिरनामा प्रसिद्ध केला, की त्यांना पकडून देणाऱ्यास ५००० रुपये रोख बक्षिस व २०० बिघे- १०० एकर जमीन जाहिर करण्यात आली. पण तरीही कोणीही इंग्रजांना मदत केली नाही. अशा प्रकारे त्यांच्या भारताच्या स्वातंत्र्यलढ्यास सर्व राजे-रजवाडे, संस्थानिक, जनता पाठिंबा देत होते.

उमाजीराजेंनी दि.१६ फेब्रुवारी १८३१ रोजी इंग्रजी सत्तेविरुद्ध एक जाहीरनामाच प्रसिद्ध केला. त्यात नमूद केले होते, की लोकांनी इंग्रजी नोकऱ्या सोडाव्यात. सर्व राजे-रजवाडे, सरदार, जमीनदार, वतनदार, देशवासीयांनी एकाच वेळी एकत्र येऊन जागोजागी बंड पुकारावे आणि इंग्रजांविरुद्ध अराजकता माजवावी. इंग्रजांचे खजिने लुटावेत. इंग्रजांना शेतसारा, पट्टी देऊ नये. असे करणाऱ्यास नवीन सरकारमधून जहागिरी, इनामे वा रोख पैशाची बक्षीसे मिळतील. ज्यांची वंशपरंपरागत वतने, तनखे इंग्रज सरकारमुळे गेले असतील ती सर्व त्यांना परत केली जातील. इंग्रजांची राजवट आता लवकरच संपुष्टात येणार आहे व नवीन न्यायाधिष्ठीत राज्याची स्थापना होइल. इंग्रजांना कोणीही मदत करू नये. तसे केल्यास नवीन सरकार त्यांना शासन करेल, असे सांगून उमाजीराजेंनी एकप्रकारे स्वराज्याचा पुकारच केला होता. संपूर्ण क्रांतिकारकांच्या इतिहासात अशा प्रकारचा व्यापक जाहिरनामा प्रथमच दिसतो. हे भारताच्या इतिहासातील सोनेरी पानच आहे. म्हणूनच उमाजीराजे हे आद्यक्रांतिकारक ठरतात. तेंव्हापासून उमाजी हे जनतेचे राजे बनले. या सर्व प्रकारामुळे इंग्रज गडबडले आणि त्यांनी उमाजीराजेंना पकडण्यासाठी युक्तीचा वापर केला. सावकार, वतनदार यांना मोठमोठी आमिषे दाखवण्यात आली .इंग्रजांनी उमाजीराजेंविरुद्ध पाचवा जाहिरनामा प्रसिद्ध केला. माहिती देणाऱ्यास १० हजार रुपये रोख आणि चारशे बिघे जमीन बक्षीस देण्याची घोषणा केली. हा इनाम त्या काळात अगनित होता. देशद्रोही त्र्यंबक चंद्रस कुलकर्णी हा फितूर होऊन उमाजीराजेंची सर्व गुप्त माहिती इंग्रजांना दिली. दि.१५ डिसेंबर रोजी भोर तालुक्यातील उतरोली या गावी रात्री बेसावध असताना त्यांना इंग्रजांनी पकडले. पुण्यात मामलेदार कचेरीतील एका काळ्या खोलीत त्यांना ३५ दिवस ठेवण्यात आले. अशा या खोलीत ते असताना त्यांना पकडणारा इंग्रज अधिकारी कॅप्टन मॉकिनटॉस दररोज त्यांची माहिती घेत होता. त्यानेच उमाजीराजेंची सर्व हकीकत लिहून ठेवली आहे. उमाजीराजेंवर देशद्रोहाचा खटला चालवण्यात आला आणि या नरवीरांना न्यायाधीश जेम्स टेलर यांनी दोषी ठरवून फाशीची शिक्षा सुनावली. देशासाठी बलिदान देणारे पहिले नरवीर उमाजीराजे नाईक दि.३ फेब्रुवारी १८३२ला पुण्याच्या खडकमाळ आळी येथील मामलेदार कचेरीत वयाच्या ४३व्या वर्षी हसत हसत फासावर चढले. जीवंतपणी सतत ताठ राहिलेली मान जीव गेल्यानंतरच वाकली. इतरांना दहशत बसावी म्हणून त्यांचे प्रेत कचेरीच्या बाहेर पिंपळाच्या झाडाला तीन दिवस लटकवून ठेवले होते. उमाजीराजेंसोबत इंग्रजांनी त्यांचे साथीदार खुशाबा नाईक आणि बापू सोळस्कर यांनाही फाशी दिली.

!! त्यांच्या अचाट देशभक्तीपर स्मृतींना संपूर्ण सप्ताहभर मानाचा लवून मुजरा !!

- संकलन व सुलेखन -
**श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी.**
(मराठी व हिंदी साहित्यकार)
मु. पो. ता. जि. गडचिरोली

# महाकुंभमेळ्यातील चेंगराचेंगरीनंतर मृतदेह नदीत फेकले - सपा खासदार जया बच्चन

महाकुंभमेळ्यात चेंगराचेंगरीची घटना मागील आठवड्यात घडली. या घटनेत ३० भाविकांचा मृत्यू झाल्याची माहितीही समोर आली. मौनी अमावस्येच्या दिवशी ही घटना घडली. अनेक भाविक पवित्र मुहुर्तावर स्नान करण्यासाठी इच्छुक होते. पहाटे तीनच्या दरम्यान अचानक गर्दी वाढली आणि चेंगराचेंगरी झाली. प्रयागराज येथील घटनेबाबत आता जया बच्चन यांनी वादग्रस्त विधान केलं आहे.

काय म्हणाल्या जया बच्चन?

महाकुंभमेळ्याच्या दरम्यान चेंगराचेंगरी झाली. त्यावेळी ज्या भाविकांचा मृत्यू झाला त्यांचे मृतदेह नदीत फेकण्यात आले. ज्यामुळे ते पाणी प्रदुषित झालं. आजही विचाराल की सर्वाधिक दुषित पाणी कुठे तर ते महाकुंभमेळ्यात आहे. कारण त्या ठिकाणी कुठलीही स्वच्छता केली जात नाही. कुंभमेळ्यात जे काही घडलं त्याबद्दल कुणीही काहीही सफाई देत नाही. मृतदेह पाण्यात फेकण्यात आल्याने ते पाणी दुषित झालं आहे. आता प्रश्न उपस्थित केले जात आहेत आणि उत्तरही तेच लोक देत आहेत. गरीब आणि कमजोर लोक यांना व्हिआयपी ट्रिटमेंट मिळत नाही. व्हिआयपी लोकांनाच ती ट्रिटमेंट मिळते. सामान्य लोकांसाठी काहीही व्यवस्था नाही. प्रयागराजमध्ये कोट्यवधी लोक आले हे तर धडधडीत खोटं आहे. इतके लोक येतीलच कसे जरा विचार करा असंही जया बच्चन म्हणाल्या.

**मृतदेह पाण्यात फेकले आणि:**

जया बच्चन पुढे म्हणाल्या, मृतदेह पाण्यात फेकण्यात आल्याने पाणी दुषित झालं आहे. हे पाणी लोकांपर्यंत तसंच पोहचतं आहे. तसंच लोकांचं लक्ष या घटनेकडून विचलित व्हावं म्हणून काळजी घेण्यात आली. मृतदेहांचं शवविच्छेदन होऊ दिलं नाही. ज्या भाविकांचा मृत्यू झाला ते मृतदेह थेट पाण्यात फेकण्यात आले. आता याच भाजपा जलशक्तीवर भाषणं देत आहेत. असाही टोला जया बच्चन यांनी लगावला.

प्रयागराज येथे सुरू असलेल्या कुंभमेळ्याला मागच्या आठवड्यातल्या बुधवारी चेंगराचेंगरीचे गालबोट लागले. 'मौनी अमावास्ये'साठी संगमावर प्रचंड गर्दी झालेली असताना मध्यरात्रीनंतर दोनच्या सुमारास चेंगराचेंगरी झाली. यात ३० जणांचा मृत्यू झाला असून ६० जण जखमी झाल्याची माहिती उत्तर प्रदेशचे पोलीस महासंचालक वैभव कृष्णा यांनी दिली. दुर्घटना घडून १२ तासांपेक्षा अधिक काळ उलटून गेल्यानंतर, संध्याकाळी आकडेवारी समोर आल्याबाबत आश्चर्य व्यक्त केले जात आहे. दरम्यान, उत्तरप्रदेश मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी या घटनेच्या न्यायालयीन चौकशीचे आदेश दिले आहेत.

**मौनी अमावस्या असल्याने प्रयागराजमध्ये भाविकांची अलोट गर्दी**

महाकुंभामध्ये 'मौनी अमावस्या' हा संगमस्नानासाठी सर्वांत पवित्र दिवस मानला जातो. यादिवशी साधूसंतांचे दुसरे शाही स्नानही असते.

ही पर्वणी साधण्यासाठी सहा ते आठ कोटी भाविक बुधवारी प्रयागराजमध्ये दाखल झाले होते. एवढी गर्दी हाताळण्यासाठी यंत्रणा सज्ज असल्याचा दावा राज्य सरकार आणि महाकुंभ व्यवस्थापनाकडून केला गेला होता. मात्र पहाटे दोनच्या सुमारास संगमस्थळाकडे जाण्यासाठी मोठा लोंढा निघाल्याने चेंगराचेंगरी झाली आणि ३० भाविकांचा मृत्यू झाला. या घटनेबाबत आता खासदार जया बच्चन यांनी वक्तव्य केलं आहे. यावर आता भाजपाकडून काही उत्तर दिलं जाणार का? हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे.

# अमेरिकेत बेकायदेशीररीत्या राहणाऱ्या भारतीयांची मायदेशी पाठवणी? लष्कराचे विमान भारताकडे रवाना

डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने कागदपत्र नसलेल्या स्थलांतरितांविरुद्ध तीव्र कारवाई सुरू केली आहे. त्यानुसार, अमेरिकेत बेकायदा राहणाऱ्या स्थलांतरितांना पुन्हा भारतात पाठवले जात आहे. अशा स्थलांतरितांना घेऊन जाणारे अमेरिकेचे लष्करी विमान भारताकडे रवाना झाले आहे, अशी माहिती एका अधिकाऱ्याने दिली असल्याचे वृत्त इंडिया टुडेने रॉयटर्सच्या हवाल्याने दिले आहे.

नाव न सांगण्याच्या अटीवर अधिकाऱ्याने सांगितले की, सी-१७ विमान स्थलांतरितांना घेऊन भारताकडे रवाना झाले आहे. परंतु ते किमान २४ तासांपर्यंत पोहोचणार नाही.

ट्रम्प यांनी अमेरिकन इतिहासातील सर्वात मोठ्या हद्दपारीचे आश्वासन दिले होते आणि यूएस इमिग्रेशन अँड कस्टम्स एन्फोर्समेंट (ICE) ने सुमारे १८,००० कागदपत्रे नसलेल्या भारतीय नागरिकांची प्रारंभिक यादी तयार केली आहे. दरम्यान अमेरिकेहून भारताच्या दिशेने निघालेल्या विमानात कितीजण आहेत, हे स्पष्ट झालेलं नाही.

अमेरिकेत बेकायदा स्थलांतरितांचा मुद्दा गाजत आहे. या पार्श्वभूमीवर जयशंकर म्हणाले होते, 'कुठलेही कागदपत्रे नसलेल्या आणि अमेरिकेत राहत असलेल्या भारतीयांना भारतात वैध मार्गाने परत आणण्यासाठी भारताचे दरवाजे कायमच खुले आहेत. अमेरिकेतील नेमक्या किती भारतीयांना परत आणता येईल, यासंबंधीची प्रक्रिया सुरू असून, अंतिम आकडा अद्याप निश्चित झालेला नाही. कायद्याने मुक्तसंचार असावा, या भूमिकेला सरकार म्हणून आमचा पाठिंबा आहे. जागतिक स्तरावर भारतीय कौशल्य आणि बुद्धिमत्तेला अधिकाधिक संधी मिळावी, अशी आमची इच्छा आहे. त्याच वेळी बेकायदा पद्धतीने कुणी कुठे जात असेल, तर बेकायदा स्थलांतराला आमचा विरोध आहे. कुठे बेकायदा घडले, तर त्याच्या बरोबरीने आणखी बेकायदा कृत्यांचा जन्म होतो. असे होणे अपेक्षित नाही''

अमेरिकेत बेकायदेशीरपणे आलेल्या भारतीय स्थलांतरितांना परत घेण्याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी जे योग्य आहे ते करतील असे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी जानेवारीमध्ये म्हटले होते . दोन्ही नेत्यांमध्ये अनेक मुद्द्यांवर चर्चा झाल्यानंतर हे वक्तव्य आले.

पेंटागॉनने एल पासो, टेक्सास आणि सॅन दिएगो, कॅलिफोर्निया येथे अमेरिकन अधिकाऱ्यांनी ताब्यात घेतलेल्या ५,००० हून अधिक स्थलांतरितांना परत पाठवण्यासाठी विमान सेवा सुरू केली आहे. आतापर्यंत, लष्करी विमानांनी ग्वाटेमाला, पेरू आणि होंडुरास येथे स्थलांतरितांना नेले आहे.

# न्यू गुरुकुल इंग्लिश मीडियम स्कूल वाहेगाव येथे वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम उत्साहात साजरा



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

गुरुवार दिनांक ३० १ २०२५ रोजी वाहेगाव ता.गंगापुर येथील न्यू गुरुकुल इंग्लिश स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम संपन्न झाला. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून हवामान तज्ञ पंजाबराव डक सर, प्रमुख पाहुणे म्हणून लोकमत वृत्त समूहाचे प्रतिनिधी श्री जयेश निरपळ सर होते. कार्यक्रमास वाहेगावचे सरपंच श्री. सुदाम भडके, नेवरगावचे सरपंच श्री. नारायण वालतुरे व विजय चोथे, हैबतपुरचे माजी सरपंच श्री. हरिभाऊ पवार, मुद्देश वाडगावचे सरपंच श्री. योगेश राव तारू, गाढेपिंपळगावचे सरपंच श्री. देवीदास सामसे व समस्त पालक वर्ग उपस्थित होते. सदर कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या विविध कलागुणांचे प्रदर्शन केले.

अहवाल वाचन प्राचार्य श्री. अरुण शिरसाठ सर यांनी केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती ख्रिस्तीना गणराज व कुमारी प्रियंका हिवाळे यांनी केले तर आभार प्रदर्शन शाळेचे अध्यक्ष श्री बाबासाहेब हिवाळे यांनी केले.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सौ. ख्रिस्तीना गणराज, सौ. संध्या हिवाळे, कुमारी प्रियंका हिवाळे, सौ. प्रीती पाटील, सौ. अभिलाषा नजन, अंजुम शेख, कल्पना तगरे, श्री महेश सोनवणे, श्री समीर शेख, श्री. विशाल माने, व सेवक वर्ग श्री. शफिक शेख, श्री आकाश खामकर श्री. हसन शहा, श्री.कलीम शहा, यांनी विशेष परिश्रम घेतले तर शाळा संचालक श्री. बाबासाहेब हिवाळे, प्राचार्य श्री. अरुण शिरसाट, व व्यवस्थापक श्री. दीपक गणराज यांनी मार्गदर्शन केले

# जल जीवन मिशन’ अंतर्गत पाणीपुरवठा योजनांच्या कामाच्या प्रगतीचा मुख्य सचिवांनी घेतला आढावा

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जल जीवन मिशनच्या माध्यमातून राज्यात ग्रामीण भागात प्रत्येक घराला कार्यात्मक घरगुती नळजोडणी देण्यात येते. पूर्ण झालेल्या योजनांच्या देखभाल दुरुस्तीसाठी स्थानिक कारागिरांना प्रशिक्षण देऊन त्यांची क्षमता बांधणी करण्याची योजना पाणी पुरवठा विभागामार्फत राबविण्यात येणार आहे. याची प्रशंसा करुन इतर विभागांनी देखील त्यांच्या मालमत्तांची देखभाल दुरुस्ती स्थानिकरित्या उपलब्ध कारागिरांकडून करुन घेण्यासाठी त्यांची क्षमता बांधणी करण्याबाबत विचार करावा, असे निर्देश मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी दिले.

पाणी पुरवठा आणि स्वच्छता अभियानाच्या शिखर समितीची बैठक मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झाली. या बैठकीत त्यांनी जल जीवन मिशन कामाच्या व्याप्ती घटकाचा त्यांनी आढावा घेतला.

पाणी पुरवठा विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजित सिंह देओल, वित्त विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, जल जीवन मिशनचे अभियान संचालक ई.रविंद्रन, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे सदस्य सचिव अभिषेक कृष्णा यांच्यासह संबंधित वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते. केंद्रीय जल शक्ती मंत्रालयाचे प्रतिनिधी तसेच राष्ट्रीय जल जीवन अभियान संचालक अरुण केंभवी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

जल जीवन मिशन प्रगतीचा आढावा

राज्यात एकूण ४०,२९७ गावे असून १,००,४०४ वस्त्या आहेत. यातील एकूण १.४६ कोटी लक्ष्यित घरांपैकी १.२९ कोटी घरांना कार्यात्मक नळ जोडणी (एफएचटीसी) पुरविण्यात आली आहे.

महाराष्ट्राने नळ जोडणी देण्याच्या बाबतीत ८८.०८ टक्के यश मिळवले आहे, जे राष्ट्रीय सरासरी ७९.७१ टक्के पेक्षा जास्त आहे. ४३,२४१ योजनांपैकी (यामध्ये पीव्हीटीजी जनमान योजना समाविष्ट आहेत आणि शाळा व अंगणवाड्या वगळल्या आहेत) ४३,१८२ योजनांसाठी (९९.८६ टक्के) कामाचे आदेश देण्यात आले आहेत. यापैकी २८,११० योजनांमध्ये (६५.२१ टक्के) काम प्रगतीपथावर असून १५,०१० योजनांची (३४.८२ टक्के) कामे पूर्ण झाली आहेत.

राज्यातील ८१,५२२ शाळांपैकी ८०,८७६ शाळांना (९९.२० टक्के) नळ जोडणी प्रदान करण्यात आली आहे. तर, ९०,६६४ अंगणवाड्यांपैकी ८९,३८६ अंगणवाड्यांना (९८.५९ टक्के) नळ जोडणी देण्यात आली आहे.

वित्तीय वर्ष २०२४-२५ मध्ये २६ जानेवारी २०२५ पर्यंत जल जीवन मिशनच्या अंम लबजावणीसाठी एकूण ४,९२५.२४ कोटी रुपये खर्च झाले असून वित्तीय वर्ष २०२३-२४ मध्ये एकूण १७,२९६.०२ कोटी रुपये खर्च झाले असल्याची माहिती यावेळी विभागामार्फत देण्यात आली.

# धार्मिक आणि लोकोपयोगी ट्रस्टसाठी नोंदणी प्रक्रियेत सुलभता व वैधता कालावधी वाढ

धार्मिक आणि लोकोपयोगी ट्रस्टसाठी कलम 12AB अंतर्गत नोंदणी प्रक्रिया सुलभ करण्यात आली आहे, ज्यामुळे अनुपालनाचा बोजा कमी होईल. यापूर्वी, अर्जामधील किरकोळ त्रुटींमुळे अर्ज रद्द केला जात असे आणि संचित उत्पन्नावर कर लावला जात होता.

मात्र, आता अपूर्ण अर्जास निर्दिष्ट उल्लंघन मानले जाणार नाही, त्यामुळे ट्रस्टसाठी दिलासा मिळेल.

तसेच, मागील दोन आर्थिक वर्षांमध्ये ५ कोटींपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या लहान ट्रस्टसाठी नोंदणीचा वैधता कालावधी ५ वर्षांवरून १० वर्षांपर्यंत वाढविण्यात आला आहे, ज्यामुळे अनुपालन खर्च कमी होईल आणि सामाजिक कार्यावर अधिक लक्ष केंद्रित करता येईल.



– सीए सपना लुणावत
सीए, एलएलबी

# महाराष्ट्रातील रेल्वे प्रकल्पांसाठी केंद्रीय अर्थसंकल्पात २३ हजार ७७८ कोटींची तरतूद

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महाराष्ट्रातील रेल्वे प्रकल्पांसाठी केंद्रीय अर्थसंकल्पात २३ हजार ७७८ कोटी रुपयांची तरतूद केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांचे आभार मानले आहेत.

यापूर्वी २००९-१४ या काळात महाराष्ट्र ाला वर्षाला सरासरी १ हजार १८१ कोटी रुपये मिळायचे. यंदा एकाच वर्षातील तरतूद ही तब्बल २० पटींनी अधिक आहे. २०१४ ते २०२५ या दरम्यान राज्यात दरवर्षी सरासरी १९१ किलोमीटर्सचे नवे रेल्वे मार्ग विकसित केले गेले आहेत. हे प्रमाण यापूर्वीच केवळ दरवर्षी सरासरी ५८ किलोमीटर इतके होते. २००९-१४ या कालावधीत एकाही मार्गाचे विद्युतीकरण झाले नव्हते. त्यानंतर २०१४ ते २०२५ या काळात दरवर्षी सरासरी ३२६ किलोमीटर्स मार्गांचे विद्युतीकरण करण्यात आले यामुळे महाराष्ट्रातील ३ हजार ५८६ म्हणजेच पूर्णपणे विद्युतीकरण झाले आहे.याच कालावधीत महाराष्ट्रात २ हजार १०५ किलो मीटर्सचे नवे रेल्वे मार्ग बांधण्यात आले. तुलनाच करायची झाल्यास ही लांबी मलेशियातील आता अस्तित्वात असलेल्या संपूर्ण रेल्वे मार्गाच्या लांबी इतकी होते.

महाराष्ट्रात सध्या १ लाख ५८ हजार ८६६ कोटी रूपयांचे ४७ प्रकल्प प्रगतीपथावर आहेत. यातून ६ हजार ९८५ किलोमीटर म ार्गाची बांधणी सुरू आहे. यामध्ये बुलेट ट्रेनसह केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजूर केलेल्या ‘डेडीकेटेड फ्रेट कॉरिडॉर- डिएफसी’ चार महत्वाकांक्षी प्रकल्पांचा समावेश आहे. राज्यात ५ हजार ५८७ कोटी रुपयांच्या तरतुदीतून १३२ अमृत रेल्वेस्थानकांची निर्मिती केली जात आहे.

रेल्वेची कवच सुरक्षा प्रणाली ४ हजार ३३९ मार्ग अंतरासाठी कार्यान्वीत केली जाणार आहे. यातील सध्या ५७६ किमीसाठीची यंत्रणा कार्यान्वीत आहे. राज्यभरात २०१४ पासून आतापर्यंत विविध ठिकाणी १ हजार ६२ रेल्वे उड्डाण मार्ग, भुयारी मार्ग (आरएफओबी, आरयुबी) बांधण्यात आली आहेत. याशिवाय २३६ ठिकाणी लिफ्ट, ३०२ एस्कलेटर्स बसविण्यात आले आहेत. तसेच ५६६ रेल्वे स्थानकांवर वायफाय सुविधा उपलब्ध दिली आहे. याशिवाय राज्यातील ११ जिल्ह्यांसाठी उपयुक्त ठरतील अशा ११ वंदे भारत रेल्वेगाड्या सुरू करण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्राच्या आतापर्यंतच्या वाटचालीत रेल्वेच्या पायाभूत सुविधांमध्ये अभूतपूर्व अशी वाढ झाली आहे. यामुळे प्रवाशांकरिता सोयी-सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. माल वाहतूक सुविधा सहज सुलभ आणि मोठ्या प्रमाणात सुरू झाली आहे.

# ड्यूक ऑफ एडिनबर्ग यांची ब्रिटिशकालीन बंकर, ऐतिहासिक वास्तूंना भेट

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

मुंबई भेटीवर आलेल्या ड्यूक ऑफ एडिनबर्ग प्रिन्स एडवर्ड यांनी रविवारी (दि. २) राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची भेट घेतली. आपल्या औपचारिक भेटीनंतर एडवर्ड यांनी राजभवनातील ब्रिटिशकालीन ऐतिहासिक वारसा वास्तूंना भेट दिली. राणी एलिझाबेथ द्वितीय व ड्यूक ऑफ एडिनबर्ग प्रिन्स फिलिप यांचे सर्वात धाकटे सुपुत्र तसेच राजे चार्ल्स तृतीय यांचे धाकटे बंधू असलेल्या प्रिन्स एडवर्ड यांनी सुरुवातीला राजभवनातील पूर्वी जमिनीखाली तोपखाना असलेल्या हिरवळीची पाहणी केली. याच हिरवळीवर एडवर्ड यांचे ज्येष्ठ बंधू प्रिन्स ऑफ वेल्स चार्ल्स यांच्या सन्मानार्थ सन १९८० मध्ये चहापान झाले होते. त्यानंतर एडवर्ड यांनी ‘जल लक्षण’ या राष्ट्रपती व पंतप्रधान यांचेसाठी राखीव असलेल्या अतिथिगृहाला भेट दिली. या अतिथीगृहात सन १९६१ मध्ये राणी एलिझाबेथ व त्यांचे पती ड्यूक ऑफ एडिनबर्ग प्रिन्स फिलिप यांचा राष्ट्रीय अतिथी या नात्याने मुक्काम होता. राज्यपालांचे सचिव प्रविण दराडे व जनसंपर्क अधिकारी उमेश काशीकर यांनी त्यानंतर एडवर्ड यांना ‘जल किरण’ अतिथीगृह, ‘जल विहार’ हे ऐतिहासिक सभागृह तसेच ब्रिटिश कालीन बंकर दाखवले. यावेळी ब्रिटनचे उप-उच्चायुक्त हरजिंदर कांग, ड्यूक यांचे खासगी सचिव ॲलेक्स पॉट्स आणि राजकीय व द्विपक्षीय व्यवहार विभागप्रमुख जॉन निकेल हे देखील उपस्थित होते. राजभवनातील अधिकाऱ्यांचे आभार मानून प्रिन्स एडवर्ड पुढील कार्यक्रमासाठी रवाना झाले. स्वातंत्र्यपूर्व काळात राजभवन येथे असलेले ‘गव्हर्मेंट हाऊस’ स्वातंत्र्यानंतर मुंबई राज्याचे व राज्य निर्मितीनंतर महाराष्ट्राचे राजभवन झाले.

# प्रतिवर्षी होणाऱ्या माघ मेळ्याचे १२ वर्षांनी होणारे भव्य स्वरूप म्हणजे कुंभमेळा

**सध्या** प्रयागराज मध्ये महाकुंभ पर्वणी सुरू आहे. कोट्यावधी श्रद्धाळू लोक गंगा, यमुना व सरस्वती (जी गुप्त रूपाने येते अशी श्रद्धा आहे) यांच्या त्रिवेणी संगमात डुबकी मारून आपल्या पापांचा नाश व्हावा म्हणून प्रयाग क्षेत्री जात आहेत. प्रयाग शिवाय अन्य तीन ठिकाणी म्हणजेच हरिद्वार, उज्जैन व नाशिक दर बारा वर्षांनी कुंभमेळा होतो. हरिद्वार, प्रयाग, उज्जैन व नाशिक येथे कुंभमेळा होण्यास (भरण्यास) कधी पासून सुरुवात झाली याबाबतीत मतमतांतरे आहेत. कुंभमेळ्याची सुरुवात नेमकी कोणत्या कारणाने झाली याबाबतीत अजून तरी ठोस असे इतिहासात सापडत नाही असे दिसते.

पुराणांचाही मागोवा घेतला तर कुंभम ेळ्याचा स्पष्ट व थेट उल्लेख कुठे सापडत नाही. समुद्रमंथनातुन निघालेला अमृतकुंभ गरुडाने पळवला व गरुडाने विश्रांतीसाठी ज्या ठिकाणी भूमीवर टेकवला त्या ठिकाणी ‘कुंभमेळा’ होतो अशी कथा सांगितली जाते. परंतु या कथेचा कुंभमेळ्याशी संबंध किंवा ‘कुंभमेळा’ या नावाचा संदर्भ महाभारत तसेच स्कंद पुराण, श्रीमद्भागवत पुराण, विष्णुपुराण, नारद पुराण अशा प्रमुख पुराणांमध्ये सापडत नाही मात्र या ग्रंथांमध्ये ‘माघस्नाना’ विषयी उल्लेख आलेले आहेत. अलीकडच्या काळात त्यालाच ‘माघमेळा’ म्हटले जाते. प्रतिवार्षिक होणाऱ्या माघस्नान किंवा माघमेळ्याला पुढे कधीतरी व्यापक रूप येऊन ठराविक वर्षानंतर तो आजच्या स्वरूपात साजरा व्हायला सुरुवात झाली असावी. याबाबतीत आद्य शंकराचार्यांचे कर्तृत्व असावे हे मानावयास जागा आहे. ज्या पद्धतीने त्यांनी सनातन धर्म विशिष्ट रचनेत आणला, पूजा पद्धती निश्चित केली, विविध मंदिरांच्या उपचार पद्धती निश्चित केल्या, संन्यास परंपरा दशनामी रचनेत गुंफून सुसूत्रता आणली, भारताचे सांस्कृतिक ऐक्य अधोरेखित केले; त्याअर्थी त्यांनीच आखाड्यांची संरचना करून कुंभमेळ्याला नामाभिधान व आजचे स्वरूप दिले असावे.

पुराणांमध्ये माघ महिन्यात सूर्य मकर राशीत असताना प्रयाग सह अन्य तीर्थक्षेत्रात स्नान केल्यावर मिळणाऱ्या फळांचे उल्लेख: नारद पुराणात सूर्य मकर राशीत असताना प्रयाग क्षेत्रात स्नान केल्यानंतर मि ळणाऱ्या फळाविषयी वर्णन आलेले आहे. प्रयाग क्षेत्रात या काळात विविध देवता, पितृगण, तीर्थे सूक्ष्मरूपात स्नानासाठी येतात. त्यामुळे त्यांच्या सान्निध्य आपल्याला मिळावे व आपली त्या संगतीने पापनिवृत्ती व्हावी असे या पुराणात सांगितले आहे.

**मकरस्थे रवौ गोविंदाच्युत माधव।**
**स्नानस्नानेन मे देव यथोक्तफ़फलदो भव ।**
(नारद पुराण, उत्तर भाग ६३ें१३-१४)

(अर्थ: मकर राशीत सूर्य असताना स्नान केल्यानंतर गोविंद, अच्युत, माधव या नावांनी ओळखल्या जाणाऱ्या भगवंताने विहित फळ प्रदान करावे)

माघे निमज्जनं दृष्ट्वा सर्वपापैः प्रमुच्यते। तत्सर्वफलकृतब पुण्यं यत्र स्नायातब प्रयत्नतः (नारद पुराण, उत्तर भाग, ३ें८-९),

(अर्थ: माघ महिन्यातील स्नान केल्याने सर्व पापांचे क्षालन होते आणि पुण्य प्राप्त होते.)

माघे मासे तु यः स्नायान्नरः सत्यव्रते स्थितः। सर्वपापविनिर्मुक्तः पुण्यलोकं स गच्छति (नारद पुराण, उत्तर भाग, ४ें१०-११)

(अर्थ:जो मनुष्य सत्यव्रताचे पालन करून माघ महिन्यात स्नान करतो, तो सर्व पापांपासून मुक्त होतो आणि पुण्यलोकात प्रतिष्ठा प्राप्त करतो.)

कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणाली द्वारे शोधले असता पुढील काही श्लोक मिळाले आहेत. ते वनपर्वातील असल्याचा तेथे दावा केला गेला आहे पण गीता प्रेस व सातवळेकर यांची आंतरजालावर उपलब्ध प्रत धुंडाळली असता सदर श्लोक वनपर्व वा अरण्यपर्वात मिळाले नाहीत. तथापि हे श्लोक माघ स्नानाचे महत्व अधोरेखित करत आहेत. माघे निमज्जनं प्राप्य सर्वपापैः प्रमुच्यते। यज्ञकृतब सर्वमेधश्च दत्तं विप्राय यतब फलम् ( वनपर्व) (माघ महिन्यातील स्नान केल्यास सर्व पापांपासून मुक्तता मिळते आणि यज्ञाच्या समकक्ष पुण्य प्राप्त होते.)

माघे स्नायातब प्रयत्नेन यो नरः स समुद्धरेतब। सर्वपापविनिर्मुक्तः पुण्यलोके महीयते (वनपर्व)

(जो माघ महिन्यात स्नान करतो, तो सर्व पापांपासून मुक्त होतो आणि पुण्यलोकात प्रतिष्ठा प्राप्त करतो.) अर्धोदय पर्वातील स्नानाचे उल्लेख व महत्व.नारद पुराणातील संदर्भ पाहता पौष व माघ महिन्यात श्रवण नक्षत्र, व्यतिपात योग युक्त रविवार असेल तर त्याला अर्धोदय पर्व असे म्हटले जाते. या काळात प्रयाग सह सर्व तीर्थात स्नान करणे म हाफलदायी मानले गेले आहे. यात एखादे प्रयोजन जरी न्यून असेल तर त्याला महोदय पर्व म्हटले जाते. तथापि या वर्षी हे पर्व आलेले नाही. शिवाय माघ शुद्ध सप्तमी, ग्रहण काळ, अयनारंभ, विषुवदिन या काळात प्रयाग क्षेत्रासह स्नानाचे महत्व प्रतिवार्षिक होणाऱ्या माघ मकर पर्वाला गुरु वृषभ राशीत असताना येणारे भव्य रूप म्हणजे प्रयाग येथील कुंभमेळा हरिद्वार, प्रयाग, उज्जैन व नाशिक येथे कुंभमेळा होतो. हे कुंभपर्व विशिष्ट खगोलीय स्थिती असताना त्या ठिकाणी होते.

प्रयाग : मकर राशीत सूर्य आणि चंद्र, तसेच वृषभ राशीत गुरु असताना. हरिद्वार: गुरु कुंभ राशीत आणि सूर्य मेष राशीत असताना. नाशिक (त्र्यंबकेश्वर): गुरु सिंह राशीत आणि सूर्य कर्क राशीत असताना. उज्जैन: गुरु आणि सूर्य अनुक्रमे तुला आणि वृश्चिक राशीत असताना.

**मौनी अमावस्या व राजसिक स्नान**

या वर्षी मकर राशीत सूर्य आणि चंद्र, तसेच वृषभ राशीत बृहस्पती आल्यानंतर प्रयाग येथे कुंभमेळा होत आहे. २९ जानेवारी ला मौनी अमावस्येचे महापर्व आल्यानंतर तिसरे राजसिक स्नान होईल. या दिवशी गुरु वृषभ राशीत असताना, सूर्य मकर राशीत असताना चंद्र उत्तराषाढा नक्षत्राच्या दुसऱ्या चरणात म्हणजेच मकर राशीत प्रवेश करेल. कुंभकोणमब येथील माघमेळा महामाघमब उत्सव हा बृहस्पती ग्रह मकर राशीत असताना आणि सूर्य कुम्भ राशीत असताना तामिळनाडू राज्यात कुंभकोणमब येथे कावेरी नदी नदीच्या किनाऱ्यावर साजरा केला जातो. हा ग्रहयोग १२ वर्षांनी एकदा येतो. महामाघमब उत्सवात ’माघी पौर्णिमा’ ही तिथी सर्वांत महत्त्वाची असते.

महामाघमब उत्सवाच्या वेळी लोक फक्त कावेरी नदीत स्नान करत नाहीत तर कुंभकोणममधील पवित्र कुंडांमध्येही स्नान करतात. येथे एकूण २० पवित्र तीर्थकुंडे (पुष्करणी) आहेत. काही प्रसिद्ध कुंडे: म हामाघ कुंड (मुख्य जलाशय), चक्र तीर्थमब, गायत्री तीर्थमब, कोटी तीर्थमब, सूर्य तीर्थमब या क्षेत्रातील उत्सवालाही लोकश्रुतीप्रमाणे समुद्रमंथनातून निघालेल्या अमृतकुंभाशी जोडले गेलेले आहे.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४ ५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४ ३ १ ० ० ५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४ ३ १ ० ० ३ येथे प्रसिध्द केले.

• **संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• **Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**